

# भारतीय समाजव्यवस्था आणि स्त्री

संपादक :
डॉ. प्रतिभा अहिरे
प्रा. वंदना बनकर

Scanned by CamScanner

भारतीय समाजव्यवस्था आणि स्त्री

**Bhartiya Samajvyavastha ani Stree**

**ISBN-978-81-925804-1-8**

**संपादक**

डॉ. प्रतिभा अहिरे

प्रा. वंदना बनकर

**प्रथम आवृत्ती** : १ जुलै २०१३

**प्रकाशक**

भारत जमधडे

ए–१२०, एफ–१५/१५, एन–६, सिडको, औरंगाबाद

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

भारत जमधडे

एफ ४०/५, अयोध्यानगर, एन–७, सिडको, औरंगाबाद

मो. ९०४९५९१७४७, ८१७७८०३२१६

**Email :** apoorvjamdhade@rediffmail.com
bharatjamdhade1976@gmail.com

**प्रकाशनाचे सर्व अधिकार** – भारत जमधडे

| | |
|---|---|
| **मुखपृष्ठ** | : राजानंद सुरडकर |
| **मुखपृष्ठ मांडणी** | : सरदार जाधव |
| **अक्षर जुळवणी** | : यजुवेन्द्र वनकर |
| **मुद्रक** | : रूद्रायणी ऑफसेट |
| **स्वागत मूल्य** | : १६० ₹ |

---

टीप – या अंकातील लेख संबंधीत लेखकांचे आहेत. या अंकात व्यक्त झालेल्या मताशी संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे नाव | | लेखकाचे / लेखिकेचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| १) | कौटुंबिक हिंसाचार आणि कायदा | – | प्रा. प्रतिभा गडवे | ८ |
| २) | कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप | – | प्रा. मधुकर आत्माराम देसले | १५ |
| ३) | भारतीय शिक्षण व्यवस्थेतील स्त्रियांची स्थिती | – | प्रा. डॉ. रश्मी बंड | २१ |
| ४) | भारतीय पुरूषप्रधान संस्कृति आणि स्त्रियांचे प्रश्न, समस्या व उपाय | – | प्रा. जोत्स्ना संभाजी पुसाटे | २६ |
| ५) | महिला सबलीकरणातील समस्या | – | प्रा. एच.पी. पारधी | ३२ |
| ६) | राजकारणातील महिलांचे स्थान | – | प्रा. अरविंद घोंगडे | ३६ |
| ७) | भारतातील क्रांतिकारी चळवळीतील स्त्रियांचे योगदान | – | प्रा. रेखा लालाजी मेश्राम | ४३ |
| ८) | स्त्री भ्रूणहत्येचे सामाजिक परिणाम | – | डॉ. प्रगती नरखेडकर | ४८ |
| ९) | भारतीय राजकारणात स्त्रियांचे स्थान | – | डॉ. अनिल सी. बनकर | ५६ |
| १०) | स्त्री–भ्रूणहत्या : एक सामाजिक कलंक | – | प्रा. सुधाकर नथ्थु जावळे | ६३ |
| ११) | स्त्रीवादाची परंपरा आणि स्वरूप | – | डॉ. मीना खरात | ७० |
| १२) | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीविषयक भूमिका व कार्य | – | प्रा. भानुसे कारभारी लक्ष्मण | ७५ |
| १३) | प्राचीन महाराष्ट्रीयन स्त्रियांचा धनाधिकार | – | डॉ. भलोंडे जगदिश | ८१ |
| १४) | भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्री वर्गाच्या समस्या : स्त्री शिक्षण एक उपाय | – | डॉ. रावसाहेब नेरकर | ८८ |
| १५) | भारतीय स्त्रियांचा बदलता दर्जा व समस्या | – | प्रा. शेटे एस.बी. | ९४ |
| १६) | सामाजिक जीवनातील स्त्रियांची सुरक्षितता | – | डॉ. हेमलता नरेश तुरणकर | १०४ |


Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | भारतीय इतिहासातील स्त्रिया | – | प्रा. जाधव दिलीप रामचंद्र | १०८ |
| १८) | महिला सबलीकरणापुढील समस्या | – | प्रा. डॉ. सुजाता गायकवाड | ११३ |
| १९) | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्तीविषयक विचार | – | किशोर उघडे | ११७ |
| २०) | स्त्रियांचे साहित्यातील स्थान | – | अभिषेक गायकवाड | १२२ |
| २१) | शिक्षण व्यवस्थेतील स्त्रियांची स्थिती | – | प्रा. वैशाली जे. रगडे | १२८ |
| २२) | स्त्री सबलीकरण : वास्तव आणि समस्या | – | डॉ. निलिमा राजेंद्र बनकर | १३६ |
| २३) | स्त्रियांचे राजकारणातील स्थान | – | प्रा. राहुल पंडित | १४२ |
| २४) | मनोसामाजिक घटकांचा स्त्रियांच्या व्यक्तिमत्वावर होणारा परिणाम | – | प्रा. खिल्लारे संदिप | १४६ |
| २५) | वैवाहिक समायोजन : काळाजी गरज | – | डॉ. पुष्पा भाग्यवंत | १५० |
| २६) | महिला सबलीकरणात बचत गटाची भूमिका | – | प्रा. वंदना बनकर | १५६ |
| २७) | भारतीय समाजातील स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा : एक विश्लेषण | – | प्रा. रमेश गुडदे | १६२ |
| २८) | साहित्य आणि स्त्री | – | राजानंद सुरडकर | १६७ |
| २९) | भांडवलशाही आणि स्त्री | – | डॉ. भाऊसाहेब झिरपे | १७० |
| ३०) | जागतिकीकरणाचा महिलांच्या दर्जावर झालेला परिणाम | – | प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे | १७३ |
| ३१) | प्रशासकीय व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान व समस्या | – | डॉ. एम.एफ. राऊतराहे | १७६ |


Scanned by CamScanner

# मनोसामाजिक घटकांचा स्त्रियांच्या व्यक्तिमत्वावर होणारा परिणाम

- प्रा. खिलारे संदीप सीताराम
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, पुणे

**प्रस्तावना :**

आपला समाज शतकानुशतके पुरुषप्रधान समाज म्हणून ओळखला जातो. स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. मात्र ऐतिहासिक काळापासुन पाहिले तर स्त्रीचे वर्णन काहींनी मोहिनी, कामिनी असे केले आहे तर दुसरीकडे तिच्या मातृत्वाचा गौरव केला आहे. कधी तिला अबला म्हटले तर कधी शक्तिमान, नैतिक-धार्मिक मूल्यांचा आधार असे म्हटले आहे. अशा प्रकारे स्त्री भोवती गूढ वलय निर्माण केलेले दिसते.

स्त्री-पुरुष हा जीवशास्त्रीय फरक शाश्वत आहे आणि जो चिरंतन राहणार आहे असे म्हटले जाते कारण आपल्या समाजात लिंगनिष्ठ भूमिकांना आदर्शाचे महत्त्व आलेले आहे व स्त्री-पुरुष दोघांचीही त्यावर श्रध्दा दिसते. संसार ही संकल्पना पती-पत्नी दोघांशिवाय पूर्ण होत नाही तसेच अपत्यप्राप्तीमध्ये दोघेही सारखेच महत्त्वपूर्ण आहेत. आजच्या काळात स्त्री-पुरुष समानता हा विषय वैचारिक पातळीवर सर्वत्र वापरला जातो; परंतु व्यवहारी जगामध्ये असे दिसत नाही. उदा. स्त्रिया नोकरी - व्यवसाय करून पतीस अर्थाजनासाठी मदत करताना आढळतात. मात्र, पुरुष स्त्रियांना घरकामामध्ये मदत करताना दिसत नाहीत. समाजात लहानपणापासुनच मुला-मुलींचे कपडे, खेळणी, संस्कार इ. बाबत फरक केलेला दिसतो व याचा परिणाम कदाचित स्त्री-पुरुष विषमता निर्माण होण्यास कारणीभूत होत असावा असे वाटते. तसेच स्त्रियांना कराव्या लागणाऱ्या भूमिकांचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होतो हे खालील काही मनोसामाजिक घटकांद्वारे स्पष्ट होते.

**१) मानसिक घटक -**

i) **स्व-आदर -** स्वतःचे आयुष्य आनंदी करण्यासाठी, मानसिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी, स्व-आदराची नितांत गरज असते. बॅरॉन व बायरन (१९९८) यांच्या मते स्व-आदर म्हणजे व्यक्तीने स्वतःचे केलेले मूल्यमापन तसेच स्वतःबद्दलच्या धन अथवा ऋण अभिवृत्ती होय. मानसशास्त्रज्ञांच्या मते बाल्यावस्थेचा विचार करता मुलांचा स्व-आदर कमी होत जातो तर मुलींचा स्व-आदर वाढतो. तसेच पौगंडावस्था व किशोरावस्थेमध्ये मुलींची सामाजिकता व प्रसन्नता याबद्दल धन दृष्टिकोन आढळतो; परंतु



Scanned by CamScanner

प्रौढावस्थेच्या जीवनापासून पुरुषापेक्षा स्त्रीचा स्व-आदर कमी होतो. कारण नैसर्गिक-सामाजिक परिस्थिती पुरुषांना पोषक बनविते तर स्त्रियांना प्रोत्साहन दिले जात नाही अशी आढळते. शिकून पुढे काय चूल आणि मूलंच सांभाळायचे अशा विधानामुळे स्त्रियांचा स्व-आदर कमी होतो.

ii) **अध्ययनार्जित असाहाय्यता -** मुलांना लहानपणापासुनच स्वावलंबी बनणे, इतरांवर प्रभाव पाडायला शिकविले जाते. यांच्या तुलनेत मुलींना दुसऱ्यांवर अवलंबून राहणे, स्वयंपूर्ण होण्यासाठी उत्तेजन न देणे, परिस्थितीचा सामना करण्यास आपण असमर्थ आहोत, असे शिकविले जाते. सेलिग्मन यांच्या मते बाल्यावस्थेत स्वतःबद्दल दुर्बल, असाहाय्य, सामर्थ्यहीन प्रतिक्रिया करायला शिकविलेल्या मुली प्रौढपणी अशाच प्रतिक्रिया देतात यालाच अध्ययनार्जित असाहाय्यता म्हटले जाते.

iii) **स्व-दुरावा -** स्त्रियांची प्रवृत्ती स्वतःला त्रास करून आनंद मिळविणे ही प्रवृत्ती किंवा इतरांसाठी त्याग त्यात स्त्री जीवनाची सार्थकता आहे, असे बिंबवल्यामुळे आपल्या काही इच्छा-आकांक्षा, आवडी-निवडीनुसार स्वतःसाठी काही करावे व स्वतःची ओळख स्वतः निर्माण करावी याचीही स्त्रीस जाणीव होत नाही.

iv) **स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा लोप -** विवाह झाल्यानंतर मुलींचे आडनाव बदलते. सामाजिक मानदंडानुसार सासरच्या इतर सदस्यांशी समायोजन करावे लागते. नम्र राहवे, सर्वांना आनंदी ठेवावे, नवऱ्याची सेवा करावी, असे सांगितले गेल्याने विवाहापूर्वी स्वतंत्रवृत्तीच्या स्त्रिया स्वतःमध्ये बदल करतात आणि नंतर पूर्णपणे परावलंबी, लीन वृत्तीच्या बनतात त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा लोप होतो.

v) **यश-अपयशाची भीती -** समाजात अर्थाजनाची पारंपरिक क्षेत्रे की ज्यावर पुरुषांचे वर्चस्व दिसते. त्या क्षेत्रात यश मिळाले तरी स्त्रीला भीती वाटते. कारण लोक आपल्यावर टीका करतील, ऋणदृष्टीकोनातुन पाहतील असे तिला वाटते आणि खरोखरच स्त्रीचे यश समाज सहजपणे मान्य करीत नाही असे दिसते. स्टेन आणि बेले (१९७३) यांच्या मते प्राथमिक शालेय जीवनापासून मुलींमध्ये अपयशाची भीती अधिक आढळते. ती तशीच वाढत गेली तर त्यांच्याकडून एखाद्या साध्या कामाची अपेक्षा केली तरी, त्या कामाच्या परिणामांच्या मूल्यमापनाबाबत मुलींमध्ये चिंता निर्माण होते.



Scanned by CamScanner

vi) **रिकामे घरटं लक्षण बंध -** स्त्रीबाबत क्षणीक पत्नी आणि अनंत काळची माता आहे असे म्हटले जाते. मध्यमवयीन स्त्रियांमध्ये नैराश्य, मानसिक अस्वास्थ्य निर्माण होण्यामध्ये हार्मोन्स कारणीभूत नसुन मातृत्वाचे कार्य नष्ट झाल्याची भावना कारणीभूत असते असे मानसशास्त्रज्ञांना वाटते. या स्त्रियांची मुले मोठी होतात, स्वतंत्र होतात यामुळे त्यांना घर सुने वाटू लागते. यामुळे या स्त्रियांमध्ये तीव्र चिंता, निराशा, अस्वास्थ निर्माण होते.

vii) **आत्मघातकी वृत्ती -** असे म्हटले जाते की पुरुष हा स्त्रीसाठी जगतो तर स्त्री ही प्रेमासाठी जगते. ज्या व्यक्तीसाठी स्त्रीने आपले जीवन समर्पण केले त्याच्यापासुन आपण अलग पडलो तर काय? ही चिंता स्त्रियांना सतत ग्रासते, तसेच ज्यांच्यासाठी आपण जगतो त्यांनाच आपली किंमत नसेल तर जगुन काय उपयोग अशी विचारसरणी स्त्रियांची आढळते. त्यामुळे स्त्रियांच्या आत्महत्येमागे एकाकी, अलग पडल्याची जाणीव आढळते.

viii) **वैयक्तिक जबाबदारी -** स्त्रिया स्वतःच्या यशाची जबाबदारी स्वतः घेत नाहीत व अपयशाची जबाबदारी मात्र स्वतः घेताना आढळतात. स्वतःच्या शक्तिपेक्षा मर्यादांवर अवधान केंद्रीत करतात त्यांना आपल्या उणीवा चांगल्या गुणांएवढ्याच महत्त्वाच्या वाटतात. यावर सांस्कृतिक घटकांचा प्रभाव आढळतो यामुळे आयुष्यातील बदलांबरोबर स्व-प्रतिमाही बदलत जाते.

ix) **उभयलिंगीत्व -** लैंगिक भूमिकेत स्त्री आणि पुरुष या दोन बाजू मूलभूत आहेत. समाजातील स्त्री गुणांबद्दलच्या असणाऱ्या अपेक्षा कधीही स्त्रीस पुरुषांच्या बरोबरीने स्थान देत नाहीत. ज्या स्त्रियांमध्ये स्त्रीत्वाबरोबरच पुरुषी गुणधर्म असतात अशा स्त्रीला आपण उभयलिंगीत्व (androgynous) असे म्हणतो. अलेक्झांड्रा कॅपलान (१८७६) यांनी उभयलिंगीत्वाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. अशा व्यक्तित्वात कोणते वर्तन योग्य कोणते अयोग्य याचे दडपण नसते. अशी स्त्री स्त्रीत्वाचे आदर्श वर्तन न करता व्यक्तिगत गरजा आणि परिस्थितीच्या मागण्यांनुसार वर्तन करते. उदा. ही स्त्री अधिकाऱ्यांशी कणखर आणि आग्रहीवृत्तीने वागेल, तिला आव्हान दिले तर स्वत्वाबाबत जागरूक राहील. तर आपल्या आपत्याशी कोमलपणे वागेल, जवळच्या व्यक्तीबाबत उघड प्रेम, माया-ममता व्यक्त करील अशा प्रकारे स्त्रीची वर्तणूक लवचिक असते.



Scanned by CamScanner

२) **सामाजिक घटक :**

व्यक्ती ज्या समाजात राहते तेथील नियम, रिती, रिवाज, अभिवृत्ती, जाणीवा हे सर्व इतरांबरोबर केलेल्या आंतरक्रियेतून शिकल्या जातात याला सामाजिकीकरण म्हणतात. हे सामाजिक घटक आपोआप व्यक्तिमत्वात समाविष्ट होतात. आई-वडील मुला-मुलींना भिन्नतेने वागवितात मुलींना घरातील काम करणे, व्यवहारामध्ये डोकं न घालणे, इतरांवर अवलंबून राहणे इतरांशी समायोजन करणे, सहनशक्ती, सहिष्णुता, संगोपन इत्यादी गुण स्त्रीवर लादले जातात व लहानपणापासूनच विरोध करण्याची क्षमता नष्ट केली जाते.

भारतीय संस्कृतीत स्त्रीच्या स्वातंत्र्याला फार मर्यादा आहेत त्यामुळे स्त्रीच्या व्यक्तिमत्वाची घडण सामाजिक दबावांशी संबंधित आहे.

**निष्कर्ष :**

स्त्रियांच्या व्यक्तिमत्वावर मनोसामाजिक घटकांचा प्रभाव पडण्यामागे वरील घटकांची माहिती आपण पाहिली. स्त्री-पुरुष समानता ही फक्त वैचारिक पातळीवर राहू नये तसेच स्त्रीचे व्यक्तिमत्व विकसीत होण्यासाठी स्त्रीबद्दल असणारे समाजातील पूर्वपरंपरागत गैरसमज दूर झाले पाहिजेत, लिंगभेदरहीत दृष्टीकोन कुटुंबामध्ये रुजविला पाहिजे. प्रत्येक गोष्टीत पुरुषांनी स्वतःला केंद्रबिंदु मानु नये, स्त्रियांचा स्व-आदर वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणे, स्वावलंबनाचे शिक्षण देणे, स्व-संरक्षण करणे, व्यक्तिमत्वाच्या गुणविशेषाची त्यांना माहिती देवून ते विकसीत करण्यासाठी प्रशिक्षण दिले पाहिजे तसेच स्त्रियांना सर्जनशील कार्यात सहभागी केले तर त्यांचा आत्मविश्वास वाढून पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रामध्ये प्रगती करतील.

**संदर्भ सूची -**


१) उपयोजित मानसशास्त्र :- डॉ. म. न. पलसाने, डॉ. सविता नवरे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर पुणे.

२) वैकासिक मानसशास्त्र :- डॉ. बोरूडे, डॉ. कुमठेकर, डॉ. देसाई (२००५)


—卐卐卐—




Scanned by CamScanner